

गोवा लायब्ररी असोसिएशनच्या मार्गदर्शिकेचे प्रकाशन करताना उपसभापती विष्णू वाघ. सोबत इतर मान्यवर.

# पुस्तकासारखा दुसरा मित्र नाही

## विष्णू वाघ : गोवा लायब्ररी असोसिएशनचे उद्घाटन

**पणजी :** पुस्तकासारखा दुसरा चांगला मित्र नाही, गुरु नाही. वेळेस मित्र मैत्री तोडू शकतो, गुरु विद्या लपवू शकतो; पण पुस्तक नाही. प्राचीन आधुनिक अशा विचारांचे संचित जाणून घेण्यासाठी पुस्तक हे महत्वाचे माध्यम आहे, असे प्रतिपादन उपसभापती विष्णू सूर्या वाघ यांनी केले.

गोवा लायब्ररी असोसिएशन या नवीन संघटनेच्या उद्घाटनसमयी प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते.

आपण किती वाचतो यापेक्षा काय वाचतो आणि कसं वाचतो यावर आपली आकलनशक्ती वाढत जाते. स्मरणशक्ती वाढते. स्वत:बद्दल, त्यांचे वाचन लेख या पार्श्वभूमीचा आढावा घेत विष्णू वाघ यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाचनासाठी आवाहन केले. आजच्या तांत्रिक युगात वाचनालयांनीसुद्धा बऱ्यापैकी आपली सांगड आधुनिक तंत्रज्ञानाशी घातलेली आहे. फक्त ज्ञानपिपासू विद्यार्थ्यांची गरज आहे. असेही वाघ म्हणाले. उपसभापतींच्या हस्ते गोवा लायब्ररी असोसिएशनच्या मार्गदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

साळगावकर कॉलेजचे प्रिन्सीपल प्रसाद सर यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थापक अध्यक्ष निर्मला परब यांनी प्रास्ताविक केले. खजिनदार बाळा मांद्रेकर यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. सूत्रसंचालन करुणा सातार्डेकर यांनी केले व सचिव मानसी वेळीप यांनी आभार मानले.

(प्रतिनिधी)

लोकमत, गुरुवार, दि. १४ जुलै २०१६